उपायाला माझी मान्यता आहे.

अशा विनाशक अर्थव्यवस्थेला विरोध सुरू झाला १९७० च्या दशकाच्या अखेरीला. १९७४ मध्ये डॉ. नरिंदर सिंग यांनी त्यांच्या Economics & Crisis of Ecology या ग्रंथाद्वारे या विरोधाला भारतात वाचा फोडली. अमेरिकेत हरमन डाली, केनेथ बोल्डिंग, जॉर्जेस्कु-रोजेन, आयर्स हे अर्थतज्ञ, तसेच आकेरलॉफ, स्टिग्लिट्झ हे नोबेल पारितोषिक विजेते या अर्थव्यवस्थेचे विनाशक स्वरूप स्पष्ट करीत आहेत. मात्र आधुनिक सायन्स व तंत्रज्ञान यांच्यावरील गाढ्या विश्वासामुळे प्रगत आणि अप्रगत देशातही हीच घातक अर्थव्यवस्था चालू आहे. तंत्रज्ञान हा निसर्गाचा पूर्ण आणि पुरेसा पर्याय आहे, अशी श्रद्धा असल्यामुळे निसर्गाच्या नाशाशी अव्याहत चालू आहे आणि त्यावर ज्यांची उपजीविका अवलंबून आहे, असे हजारो लोक दारिद्र्याच्या खाईत लोटले जात आहेत. या संबंधात नवी दिल्लीहून प्रसिद्ध झालेले दोन अहवाल — Disequalizing Growth आणि Decline of the Development State हे आपण वाचले नसल्यास जरूर पहावेत. Alternative Survey Group या अर्थतज्ञांच्या चमूने हे अहवाल संशोधिले आहेत.

आपण एका महत्त्वाच्या विषयाला हात घातला, हे फार चांगले झाले. या विनाशक अर्थव्यवस्थेचा जितका विरोध होईल, तितके चांगले. कळावे, लो.अ. नवीन वर्ष आपणास सुखाचे जावो.

आ.

प्रकाश गोळे

१२/१२/९७.

anil.pimplapure@gmail.com

राजन व मीना नीर

Tele. Vir

2611 9168